
# सुट्टीसाठीचे उपक्रम



SHANTiLAL MUTTHA FOUNDATiON

# या पुस्तिकेमागचा उद्देश काय आहे?

कोव्हिड १९ च्या लॉकडाऊनमुळे मुलांना आता दीर्घकाळ सुट्टी मिळालेली आहे. मात्र या सुट्टीत त्यांनी घराबाहेर पडणे किंवा बाहेर खेळणे अपेक्षित नाही.

हे मुलांसाठी आणि पालकांसाठीसुद्धा त्रासदायक होऊ शकेल.

मात्र या परिस्थितीला एक सकारात्मक बाजूही आहे. या काळात तुम्ही मुलांसाठी घरी अनेक प्रकारचे मनोरंजक उपक्रम घेऊ शकता.

पैसे खर्च न करता अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन कसे करावे, याबाबत प्रस्तुत पुस्तिकेमध्ये माहिती दिलेली आहे.

पुस्तिकेतील उपक्रमांमधील बहुतेक उपक्रम तुम्हाला पुनःपुन्हा घेता येतील. तसेच काही उपक्रमांसाठी एकापेक्षा जास्त दिवस लागतील.

# हे उपक्रम अशाप्रकारे लाभदायक ठरतील

- मुले गुंतून राहतील.
- भाषा, गणित, कला, इ. विषयांमधील कौशल्ये त्यांच्यात विकसित होतील.
- मुलांबरोबरचे तुमचे नातेसंबंध सुधारतील.

- या उपक्रमांमधून आनंद मुलांना मिळेल.

## उपक्रमांचे विभाग

उपक्रम चार विभागांत दिलेले आहेत:

- भाषा
- गणित
- परिसर
- कला

## उपक्रम कोणासाठी आहेत?

पुस्तिकेत दिलेले सर्व उपक्रम प्राथमिक शाळेतील मुलांसाठी आहेत. मात्र यात काही बदल करून, तुम्ही त्यांच्यापेक्षा थोड्या मोठ्या किंवा किशोरवयीन मुलांसाठीदेखील घेऊ शकता.

येथे दिलेले उपक्रम एकाच वयोगटाच्या (४-६, ६-८ वर्षे, इ.) एका किंवा अनेक मुलांसोबत घेता येतील.

जर तुमची मुले वेगवेगळ्या वयोगटातील असतील, तर त्यांना वेगवेगळ्या उपक्रम देणे अधिक चांगले.

## किती वेळा?

प्रत्येक दिवशी १-३ उपक्रम घ्यावेत.

जितक्या वेळा शक्य असेल, तितक्या वेळा उपक्रमांमध्ये थोडा बदल करून ते पुनःपुन्हा घेण्याचा प्रयत्न करावा.

## आपले स्वत:चे उपक्रम तयार करा

येथे सुचवलेल्या उपक्रमांवर आधारित उपक्रम तुम्ही स्वतः तयार करू शकता. इंटरनेटवरही अशा उपक्रमांचा शोध घेता येईल.

मात्र दररोज पूर्णत: नव्या उपक्रमांचा संच घेणे टाळावे.

## सुरुवात करण्याआधी

- मुलांना या उपक्रमांबाबत कल्पना द्यावी. उपक्रमांमधून त्यांच्यात कुतूहल जागृत करावे.

- दररोज उपक्रम करण्यासाठी काही वेळ राखून ठेवावा. तो किमान १० मिनिटे ते कमाल १ तास एवढा असू शकेल.

- मुलांना दैनंदिन वेळापत्रक आखण्यास व त्याचे पालन करण्यास मदत करावी.

दैनंदिन वेळापत्रक अनेक कारणांमुळे उपयुक्त ठरते :

(i) मुलांना ठराविक दिनक्रम आवडतो.

(ii) त्यांना आपल्या वेळेचा अधिक चांगल्याप्रकारे उपयोग करता येतो.

(iii) विशिष्ट दिनक्रमाचे पालन केल्यामुळे मुलांमध्ये चांगले गुण  विकसित होतात.

## उपक्रम कशाप्रकारे घ्यावा?

- आधी उपक्रमाचे वाचन करावे.

- मग मुलांना उपक्रमाबद्दल थोडक्यात सांगावे.

- त्यांना त्याबाबत स्पष्ट सूचना द्यावी. काय करायचे आहे, हे त्यांना समजले असल्याची खात्री करून घ्यावी.

- त्यांना त्यांच्यामर्जीप्रमाणे उपक्रम करू द्यावा. जर मुले उपक्रमाशी संबंधीत नसणाऱ्या गोष्टी करू लागली, तर त्यांना सौम्यपणे उपक्रमातील नेमक्या गोष्टी करण्याची आठवण करून द्यावी.

- प्रत्येक उपक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ द्यावा.

- मुले उपक्रम पूर्ण करत असताना शांतपणे निरीक्षण करावे. त्यांना कल्पना सुचवणे किंवा टीकाटिप्पणी करणे टाळावे.

- मुलांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करावे.

# अनुक्रमणिका


१. भाषाविषयक उपक्रम 7

२. गणितविषयक उपक्रम 17

३. परिसरविषयक उपक्रम 23

४. कलाविषयक उपक्रम 27

# १. भाषाविषयक उपक्रम



मुलांचे भाषिक कौशल्य विकसित व्हावे याकरता घरी कितीतरी मजेदार उपक्रम घेता येतात.

हे उपक्रम घेत असताना, पुढील मार्गदर्शक सूचना लक्षात घ्याव्या :

- मुलांना त्यांच्या स्वतःच्या शब्दांत व्यक्त होऊ दिले पाहिजे.
- मुले बोलत वा लिहीत असताना त्यांच्या भाषेमधील चुका दुरुस्त करणे टाळावे. (पाहा : *'भाषेच्या संदर्भातील चुका कशाप्रकारे दुरुस्त कराव्यात'*.)

## उपक्रमातील : बोलण्यासाठीचा वेळ

प्रत्येक दिवशी आपल्या मुलांशी विशिष्ट विषयांवर बोलण्यासाठी किमान ५-१० मिनिटे राखून ठेवावा. यासाठी कोणते विषय निवडायचे, याबद्दल त्यांच्यासोबत चर्चा करू शकता.

मुलांना ताण येईल किंवा भीती वाटेल अशाप्रकारचे विषय निवडणे टाळावे.

उदाहरणादाखल काही विषय :

- माझा सर्वात आवडता मित्र / आवडती मैत्रीण
- माझे छंद
- माझ्या आयुष्यातील सर्वाधिक आनंदाचा प्रसंग
- माझी सर्वात आवडती गोष्ट
- शाळेमध्ये मी काय करतो / करते
- काल मी काय केले

निश्चित केलेल्या विषयावर संभाषण करण्यासाठी एखादी शांत जागा निवडावी. मुलांना काही प्रश्न विचारून संवादाची सुरुवात करावी. नंतर, मुले बोलू लागल्यावर तुम्ही त्यांना जास्तीचे प्रश्न विचारू शकता.

वेगवेगळे शब्द, चेहऱ्यावरील हावभाव आणि हातवारे यांच्या साहाय्याने ती कशी व्यक्त होतात याचे निरीक्षण करावे. त्यांना प्रतिसाद देताना तुम्हीदेखील अशाप्रकारचे हावभाव किंवा हातवारे करू शकता.

निवडलेल्या विषयाच्या चौकटीला धरून हे संभाषण असावे.

येथे ६ वर्षांच्या मुलीच्या सर्वांत आवडत्या मित्राबाबत तिच्याशी केलेल्या संभाषणाचा नमुना दिलेला आहे :

***पालक :***

आज आपण तुझ्या मित्रमैत्रिणींबद्दल बोलू. तुला खूप मित्र-मैत्रिणी आहेत. होय ना?

***मुलगी :***

होय. खूप आहेत. खूप खूप मित्र आहेत मला... (हात पसरते)

***पालक (हसून) :***

खूप छान! तर मला सांग तुझा सर्वांत आवडता मित्र किंवा मैत्रीण कोण आहे?

***मुलगी :***

समीर.

***पालक :***

अरे वा ! समीर. तो तुझा सर्वांत आवडता मित्र का आहे?

***मुलगी :***

कारण… (विचार करते) कारण…

***पालक (शांतपणे वाट पाहत):***

कारण…

***मुलगी :***

तो माझ्यासोबत खेळतो. तो नेहमीच खेळायला तयार असतो.

***पालक (हसून) :***

किती छान आहे हे ! तुम्ही कोणकोणते खेळ खेळता?

## उपक्रम : गोष्टी

सगळ्याच मुलांना गोष्टी ऐकायला खूप आवडतात. गोष्टींचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारची कौशल्ये विकसित करता येऊ शकतात :

- लक्षपूर्वक ऐकणे
- एखाद्या परिस्थितीची कल्पना करणे
- अन्य लोकांना समजावून घेणे
- नवे शब्द व संकल्पना शिकणे
- घटनेतील क्रम समजावून घेणे

मुलांना गोष्टीमध्ये गुंतवून ठेवण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत :

- तुम्ही एखादी ऐकलेली गोष्ट सांगू शकता किंवा तुम्ही स्वतः तयार करून एखादी गोष्ट सांगू शकता. मुलांनी या गोष्टीतल्या जगात प्रवेश करावा म्हणून तुम्ही आपल्या आवाजात चढउतार करून व हातवारे करून ती रंजक बनवू शकता.
- तुम्ही पुस्तकामधून गोष्ट वाचून दाखवू शकता.

- तुम्ही तुमच्या मोबाईल फोनवर किंवा कॉम्प्युटरवर गोष्टीचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग लावू शकता.

जर गोष्ट मोठी असेल, तर त्यातील मुख्य घटनांनंतर थांबावे. मुलांना गोष्टीचा तेथपर्यंतचा भाग समजला असल्याची त्यांना काही प्रश्न विचारून खात्री करावी. तुम्ही त्यांना असेही विचारू शकता : मग पुढे काय झाले असेल असे तुम्हाला वाटते?

मुलांनी गोष्ट ऐकल्यानंतर, तुम्ही त्यांना काही प्रश्न विचारू शकता :

- तुम्हाला ही गोष्ट कशी वाटली?

- गोष्टीमध्ये काय काय घडले?

- त्याने (एखाद्या पात्राने) असे का केले?

- त्याने तसे केले नसते तर?

तुम्ही एकच गोष्ट अनेक वेळा सांगू शकता. मुलांना एखादी गोष्ट चांगल्या प्रकारे ठाऊक झाल्यावर, तुम्ही वेगवेगळ्या टप्प्यांवर थांबून त्यांना विचारू शकता : मग पुढे काय झाले?

पुढे तुम्ही मुलांना तीच गोष्ट त्यांच्या स्वतःच्या शब्दांत सांगायला सांगू शकता.

## उपक्रम : साभिनय गाणी म्हणणे

मुलांना समजतील व त्यांना तुमच्यासोबत म्हणता येतील अशाप्रकारची गाणी निवडावी. गाण्याशी जुळेल अशाप्रकारे अभिनय करावा आणि मुलांनाही अभिनय करण्यास सांगावे.

गाण्यासोबत साथीला संगीत वाजवण्याकरता तुम्ही दररोजच्या वापरातील काही वस्तूंचा उपयोग करू शकता!

## उपक्रम : गोष्ट तयार करणे

तुम्ही मुलांना स्वतः गोष्ट रचायला सांगू शकता किंवा तुम्ही त्यांच्यासोबत मिळून गोष्ट तयार करू शकता.

या गोष्टीचा आरंभबिंदू म्हणजे काही शब्द किंवा एखाद्या वाक्याने सुरुवात करू शकता. उदा :

- दोन खोडकर माकडे
- एक मांजर आणि एक कुत्रा
- एक मुलगी शाळेकडे निघाली. इतक्यात जोरात पाऊस पडू लागला.
- एक स्वाभिमानी राजा होता.

मुले स्वतः ज्या गोष्टी तयार करतील त्यांना कदाचित फारसा अर्थ असणार नाही. मात्र जोवर मुले आपल्या स्वतःच्या शब्दांत गोष्टी तयार करत आहेत, तोवर त्यांनी तसे करण्यास हरकत नाही!

गोष्ट तयार करून झाल्यावर मुलांना या गोष्टीतील एखादे पात्र किंवा प्रसंग यांचे चित्र काढण्यास सांगावे. थोड्या मोठ्या वयाच्या मुलांना गोष्ट आपल्या स्वतःच्या शब्दांत लिहिण्यास सांगावे.

## उपक्रम : चित्रांबाबत बोलणे

एखादा फोटो किंवा चित्र निवडा आणि मुलांसोबत खाली दिलेल्या उदाहरणांनुसार त्याबद्दल संवाद साधा :

- तुला या चित्रामध्ये काय दिसते?
- आणखी काय आहे?
- (चित्रातील एखाद्या गोष्टीचा) रंग कोणता आहे?
- ही व्यक्ती काय करते आहे? ती व्यक्ती ते का करत असेल असे तुला वाटते?

## सूचना : भाषेच्या संदर्भातील चुका दुरुस्त करणे

कोणत्याही प्रकारचे अध्ययन करत असताना त्यात चुका होणे अगदी स्वाभाविक असते. त्यामुळे याबाबत फारशी चिंता करण्याचे कारण नाही. खास करून भाषेच्या बाबतीत सुरुवातीला 'अचूक' वाक्यरचना करण्यापेक्षा स्वतःला व्यक्त करणे अधिक महत्त्वाचे आहे.

अर्थात, चुकांकडे पूर्णतः दुर्लक्ष करूनही चालणार नाही. त्याकरता तुम्ही पुढील गोष्टी करू शकता :

- मुले बोलत वा लिहित असताना त्यांच्या चुकांकडे निर्देश करणे टाळावे.
- त्यांचे लिहून अथवा बोलून झाल्यानंतर, त्यांच्या चुकीच्या वाक्याला पुढील प्रकारे दुरुस्त करावे : म्हणजे, तुला असे म्हणायचे होते का...
- वयाने जरा मोठ्या असणाऱ्या मुलांना त्यांची चुकलेली वाक्ये किंवा शब्द अचूकपणे पुन्हा लिहिण्यास सांगावे.
- जर एखादे वाक्य किंवा शब्द योग्य प्रकारे लिहिला जाण्याबाबत तुम्हाला खात्री नसेल, तर अन्य कुणाला विचारा किंवा सोडून द्या!

## उपक्रम : शब्दांसंबंधीचा खेळ

घरी वेगवेगळ्या प्रकारचे शब्दांसंबंधीचे खेळ खेळता येतात. कुटुंबातील सगळे सदस्य यात भाग घेऊ शकतात.

#१.

एखादे विशिष्ट अक्षर घेऊन त्याने सुरू होणारे अधिकाधिक शब्द सर्व खेळाडूंनी म्हणून दाखवायचे.

आधी उच्चारून झालेला शब्द दुसऱ्या कोणाला पुन्हा वापरता येणार नाही.

जो कोणी सगळ्यात रंजक शब्द उच्चारेल तो 'विजेता' होईल. (सगळ्या मुलांना विजेता घोषित करता येईल असे पाहावे.) हाच खेळ वेगवेगळी अक्षरे वापरून खेळावा.

#2.

वरील खेळामध्ये आणखी काही नियमांची भर घालून तो अधिक आव्हानात्मक बनवता येईल :

- माणसांची नावे  वापरता येणार नाहीत.
- केवळ मुलींची/स्त्रियांची नावेच  वापरता येतील.
- केवळ जागांचीच नावे वापरता येतील.
- केवळ गुण दर्शवणारे शब्दच वापरता येतील.

#3.

एका कोऱ्या कागदावर ४ स्तंभ आणि ६-८ आडव्या रांगा असणारे एक तक्ता (Table) काढा.


त्यातील स्तंभांना पुढीलप्रमाणे शीर्षक द्या : **अक्षर, ठिकाण, नाव, वस्तू.**

पहिल्या स्तंभाच्या प्रत्येक आडव्या रांगेत एक अक्षर लिहा. मुलांना त्या अक्षराने सुरू होणारी माणसांची नावे, ठिकाणांची नावे आणि वस्तूंची नावे याबद्दल विचार करायला सांगावे. प्रत्येक आडव्या रांगेत त्यांना याची उत्तरे लिहिण्यास सांगावे.

(जर त्यांना योग्य प्रकारे लिहिता येत नसेल, तर त्यांच्या वतीने तुम्ही उत्तरे लिहा आणि लिहून झाल्यावर प्रत्येक शब्द त्यांना वाचून दाखवण्यास सांगा.)

तुम्ही त्यांना काही शब्द सुचवू शकता, मात्र मुलांनी तोवर पूर्णपणे प्रयत्न करून झालेले असले पाहिजेत. (आणि काहीवेळा तुम्हालाही प्रत्येक स्तंभासाठी शब्द सुचेनासे होतील!)

# २. गणितविषयक उपक्रम



अनेक प्रकारचे गणिताचे उपक्रम गणिताचे पाठ्यपुस्तक न वापरता घरी घेता येतात.

तुमच्या मुलांची जी अध्ययन पातळी असेल त्यानुसार खालीलपैकी उपक्रम निवडावे. मुलांना कोणत्याही प्रकारच्या सूचक गोष्टी किंवा उत्तरे न सांगता या उपक्रमात सहभाग घ्यावा.

## उपक्रम : लहान आणि मोठा

पेन, पेन्सिली, नाणी, बटणे, पादत्राणे, स्क्रू ड्रायव्हर किंवा वेगवेगळ्या आकाराचे कागदाचे तुकडे जमिनीवर विखरून ठेवा.

त्यानंतर मुलांना विचारा :

- यातली सर्वांत छोटी वस्तू कोणती आहे?

- यातली सर्वांत मोठी (किंवा सर्वांत उंच) वस्तू कोणती?

- तुम्ही यातील सर्वांत लहान गोष्टीपासून सुरुवात करून सर्वांत मोठ्या गोष्टीपर्यंत या वस्तू रांगेत मांडून ठेवू शकता का?

## उपक्रम : सोपी गणना

स्वयंपाकघरात उपलब्ध असणाऱ्या गोष्टींचा वापर करून अंक मोजायला शिकवता येते. उदा :

#१.
मुलांना पिशवीभर कांदे द्यावे व सांगावे : मला ५ कांदे दे… आता मला आणखी ४ दे पाहू.

#२.
एका पिशवीत काही बटाटे भरावे आणि मुलांना विचारावे : या पिशवीत किती बटाटे असतील असे तुम्हाला वाटते? तुम्हाला खात्री आहे का? मोजा आणि तपासा पाहू.

#३.
जमिनीवर काही कांदे व वांगी ठेवावे आणि मुलांना विचारावे: यामध्ये कांदे जास्त आहेत की वांगी?… किती जास्त आहेत?

#४.
मुलांना सांगावे : अशी कल्पना करा, की आपल्या घरी जेवायला सहा लोक येणार आहेत. त्यांना जेवण वाढण्यासाठी आपल्याला किती ताटे, वाट्या, चमचे आणि ग्लास लागतील? तुम्ही ते सारे या टेबलावर मांडू शकता का?

## उपक्रम : निरीक्षण आणि मोजणी

मुलांना घरभर फिरून पुढील प्रश्नाचे उत्तर द्यायला सांगावे (एकावेळी एकच प्रश्न विचारावा) :

#१. आपल्या घराला किती खिडक्या आहेत? किती दरवाजे आहेत?

#२. या खोलीला किती फरश्या आहेत?

#३. तुम्ही जेथे बसला आहात, तिथून पिवळ्या रंगाच्या किती वस्तू दिसत आहेत? लाल रंगाच्या किती वस्तू दिसत आहेत?

#४. आपल्या घरात असणाऱ्या कुंड्यांमधील झाडांपैकी कोणत्या झाडाला सर्वांत जास्त पाने आहेत? सर्वांत कमी पाने कोणत्या झाडाला आहेत?

## उपक्रम : व्यावहारिक गणिते

मुलांना एक फूटपट्टी, एक पेन आणि कागद द्यावा. त्यांना विचारावे :

#१. आपल्याला या खोलीची लांबी कशी मोजता येईल? तू या खोलीची लांबी मोजून ती सांगू शकतोस का?

#२. हीच गोष्ट अधिक वेगाने करण्यासाठी एखादा पर्याय आहे का? (टीप : जिची लांबी ठाऊक आहे, अशी दोरी या मोजणीकरता वापरता येईल.)

#३. या खोलीचे क्षेत्रफळ किती आहे?

#४. या खोलीचे क्षेत्रफळ आणि शेजारील खोलीचे क्षेत्रफळ यात किती फरक आहे?

## उपक्रम : रुपये आणि पैसे

मुलांना काही ५, १० आणि १०० रुपयांच्या नोटा व वेगवेगळ्या मूल्याची काही नाणी द्यावी.

मग त्यांना पुढीलप्रमाणे पैशाशी संबंधित गणिते सोडवायला सांगावी :

- तुला एकूण किती पैसे दिले आहेत, हे तू मला सांगू शकशील का?
- एकूण रक्कम १,००० रुपये होण्याकरिता तुला आणखी किती पैसे द्यावे लागतील?
- तू मला पस्तीस रुपये देऊ शकतोस का?
- तुझ्याकडे दहा रुपयाच्या किती नोटा आहेत? जर तुला दहा रुपयाच्या आणखीन १४ नोटा दिल्या, तर मग दहा रुपयांच्या सगळ्या नोटांचे मिळून एकंदर मूल्य किती असेल?... आणि तुझ्याकडे एकूण किती रक्कम  होईल?

## उपक्रम : दुकानदार

भाजी, कपडे किंवा पादत्राणे यांचा वापर करून मुलांना एखादे छोटे दुकान थाटण्यास सांगावे.

त्यांच्यासोबत, प्रत्येक वस्तूची ‘खरेदी करण्यासाठी लागणारी किंमत' निश्चित करावी.

नंतर तुम्ही अनेक उपक्रम घेऊ शकता :

#१.
मुलांना दुकानात असणाऱ्या प्रत्येक वस्तूची तिच्या खरेदीच्या किंमतीसकट एक यादी बनवायला सांगावी. दुकानात त्यांची ‘एकूण गुंतवणूक’ किती झाली आहे, याचा हिशेब करण्यास सांगावे.

#२.
वस्तूंची विक्री करून त्यांना किती फायदा मिळवायचा आहे, हे मुलांना निश्चित करायला सांगावे. त्यानुसार त्यांना प्रत्येक वस्तूच्या विक्रीच्या किंमतीची यादी तयार करायला सांगावी.

#३.
दुकानदाराला काही नाणी, नोटा सुट्टे पैसे म्हणून वापरायला द्यावे.

तुम्ही व घरातील इतर लोकांनी या दुकानातून वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकाची भूमिका बजावावी. तुम्ही दुकानदाराशी किंमत कमी करण्याबाबत घासाघीस करू शकता.

काही वस्तूंची खरेदी रोख पैसे देऊन करावी. दुकानदाराने तुम्हाला उरलेले सुट्टे पैसे अचूकपणे दिले पाहिजेत याकडे लक्ष द्यावे.

‘दुकानाची कामाची वेळ’ संपल्यानंतर दुकानदाराने खालील गोष्टींचा हिशेब लावायचा आहे :

- विक्रीतून मिळालेला नफा
- विकल्या न गेलेल्या मालाची किंमत

# ३. परिसरविषयक उपक्रम



इयत्ता ३ रीमध्ये ‘परिसर’ या विषयाचा परिचय करून दिलेला आहे. त्यामध्ये भौतिक व सामाजिक परिसराचा समावेश असतो.

इयत्ता १ ली आणि २ रीमध्ये शिकणारी मुलेसुद्धा तुमच्या मदतीने खालीलपैकी काही उपक्रम करू शकतील.

## उपक्रम : आपले कुटुंब

#१.
मुलांना एक छोटी वही, आलेख किंवा भित्तीपत्रक (पोस्टर) यांद्वारे कुटुंबातल्या सगळ्या सदस्यांचे चित्रण करायला सांगावे. (येथे मुलांनी वास्तवदर्शी चित्रे काढणे अपेक्षित नाही!)

मुलांच्या अध्ययन पातळीनुसार, तुम्ही त्यांना पुढील जास्तीची माहितीही भरण्यास सांगू शकता :

- प्रत्येक सदस्याचे नाव
- प्रत्येक सदस्याचे वय
- प्रत्येक सदस्याच्या आवडत्या व नावडत्या गोष्टी

#२.

मुलांसोबत कुटुंबातील सगळ्या सदस्यांची नावे असणारा एक कच्चा तक्ता तयार करावा. यामध्ये आजी-आजोबा, काका-मामा, आत्या-मावशी, तसेच चुलत–मावस–मामे-आत्ये भावंडे इत्यादींचा समावेश असेल.
मग मुलांना या तक्त्याला पक्के रूप देण्यास सांगावे. याकरता रंग व सजावटीसाठी अन्य गोष्टींचा वापर ते करू शकतील.

हे तक्ते तयार करून झाल्यानंतर, तुम्ही त्यांना प्रत्येक सदस्याबद्दल आणखी माहिती सांगू शकता.

#३.

मुलांना कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे व फोन नंबर असणारी एक छोटीशी टेलिफोन डायरी बनवायला सांगावे. (यामध्ये जे लोक तुमच्या घरात राहत नाहीत, पण नियमितपणे संपर्कात असतात त्यांचाही समावेश असावा.)

डायरी बनवून झाल्यानंतर, तुम्ही मुलांना या डायरीत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला फोन करण्यास व तिला शुभेच्छा देण्यास सांगू शकता.

## उपक्रम : अल्बम

मुलांना जुन्या वह्यांमधील कोरे कागद वापरून ‘कोरा अल्बम’ बनवण्यास सांगावे.

त्यानंतर त्यांना छायाचित्रे असलेली जुनी वर्तमानपत्रके व नियतकालिके द्यावी. त्यांना त्यामधील फोटो कापण्यास सांगावे. खालीलपैकी एखाद्या संकल्पनेला धरून त्यांना अल्बम बनवायला सांगावे :

- लोक
- स्थळे
- व्यवसाय
- क्रीडा
- प्रसिद्ध व्यक्ती
- कपडे

## उपक्रम : झाडे वाढवा

मुले तुमच्या मदतीने घरी कितीतरी प्रकारच्या भाज्या व फुले येणारी झाडे वाढवू शकतात. तुमच्याकडे जर कुंड्या नसतील, तर तुम्ही पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्या (अर्ध्या कापून), जुने कप किंवा भांडी, प्लॅस्टिकचे ट्रे किंवा कागदी कप वापरू शकता.

बिया पेरण्यापासून सुरुवात करावी व मुलांना पुढील बाबींचे निरीक्षण करण्यास सांगावे :

- बीला अंकुर फुटण्यासाठी किती दिवस लागले?

- दर आठवड्याला वाढ किती झाली?

- आपण झाडाला पाणी घालणे बंद केले तर काय होईल?

## उपक्रम : रद्दी कागदापासून हस्तकला

रद्दी कागदापासून कोणकोणत्या वेगळ्या वस्तू बनवता येतील याबद्दल मुलांना विचार करायला सांगावे. याबाबतच्या काही कल्पना :

- चौरस, आयत, अंडाकृती, गोलाकृती, त्रिकोणी आणि शंकरपाळयासारखे आकार
- खेळण्यातील विमान, बोट, अग्निबाण, घर, झाड
- प्राण्यांचे आकार
- पाकिटे, टोप्या, छोटी खोकी

या कलाकृती तयार करायला सुरुवात करण्याआधी तुम्ही मुलांना त्या कशा बनवायच्या, हे दाखवू शकता. यासंबंधीचे युट्यूबवर असणारे व्हिडिओ तुम्ही त्यांना दाखवू शकता.

शक्य असल्यास, मुलांना आपल्या कलाकृती अधिक आकर्षक बनवण्यासाठी रंगीत सामग्रीचा वापर करू द्यावा.

# ४. कलाविषयक उपक्रम



याआधीच्या भागात काही कलाविषयक उपक्रम दिले आहेत. आणखी काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

## उपक्रम : आकार

हा उपक्रम दोन स्तरांवर घेता येईल :

१. जी मुले लिहिण्यास शिकत आहेत, त्यांना तुम्ही काही सोपे आकार कागदावर काढून द्यावे. त्यांना त्यासारखे आकार काढण्यास सांगावे. (त्यांनी अचूक, जशीच्या तशी नक्कल करण्याची अपेक्षा ठेवू नका.)

२. ज्या मुलांचे लेखनकौशल्य विकसित झाले आहे व ज्यांना वेगवेगळे आकार काढता येतात, त्यांच्यासाठी हा उपक्रम आहे. त्यांना चौरस, आयत आणि शंकू (पिरॅमिड) यांसारखे वेगवेगळे भौमितिक आकार वापरून निरनिराळ्या रचना करण्यास सांगावे. हे आकार एकमेकांना झाकणारेही (overlapping) असू शकतील.

या आकारांना पेन्सिल किंवा पेन, वापरून तसेच तेलकट खडू, रंगीत पेन्सिली इत्यादींच्या मदतीने रंगवता येईल.

## उपक्रम : तुमच्या आवडीप्रमाणे चित्र काढणे

हा उपक्रम ऐकायला जरी सोपा वाटला, तरी अनेक मुलांना तो दोन मुख्य कारणांमुळे अवघड वाटू शकतो.

- त्यांना कधीच स्वतःचा विचार करण्याची संधी दिली गेलेली नसते.
- मुलांनी कशाचे चित्र काढावे व ते कशाप्रकारे काढावे याबाबत प्रौढ व्यक्तींच्या विशिष्ट अपेक्षा असतात... आणि मुले त्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाहीत.

यापैकी दुसरी गोष्ट तुम्ही टाळू शकता व मुलांना आपल्या मनाप्रमाणे चित्र काढू देऊ शकता.

जर तुम्हाला त्यांना काही विषय सुचवायचे असतील, तर तुम्ही खालीलप्रमाणे ते सुचवू शकता :

- काही निसर्गदृष्ये (झाडे, फुले, डोंगर, नद्या, इ.)
- घर आणि एक झाड, फुले असलेले एक झाड, फुले, मासा, बोट, इत्यादी
- मोबाईल फोन, टीव्ही, कपाट किंवा दरवाजा यांसारख्या घरात असणाऱ्या वस्तू

- स्वतःचे आणि घरातील इतर सदस्यांची चित्रे

मुलांनी आपले चित्र पूर्ण केल्यानंतर, त्यांना चित्राबद्दलची अधिक माहिती सांगण्यास सांगावे.

त्यांच्या प्रयत्नावर टीका करणे किंवा त्यांची चेष्टा करणे टाळावे.

## उपक्रम : रांगोळीचा नमुना


एका कोऱ्या कागदावर रांगोळीसाठीचा नमुना काढून दाखवावा, किंवा मुलांना तो Google Image वर पाहून काढण्यास सांगावा.


मुलांना तुम्ही पुढील गोष्टी करण्यास सांगू शकता:

- रांगोळी रंगवणे
- ठिपक्यांवर किंवा रेषांवर तूरडाळ किंवा रंगीत बटणे यांसारख्या छोट्या गोष्टी चिकटवणे.
- स्वतः रांगोळी काढून ती रंगवणे.

## उपक्रम : चौरसांचा वापर केलेली रचना

मुलांना एक चौरस काढण्यास सांगावे. या चौरसात १६, २५ किंवा ३६ छोटे चौकोन असतील. प्रत्येक छोट्या चौरसाला वेगळ्या प्रकारे रंगछटांचा वापर करून किंवा वेगवेगळे रंग वापरून त्यांना एक छानशी रंगांची रचना करायची आहे. याबाबतची काही उदाहरणे खाली दिली आहेत.





## उपक्रम : पाहा आणि चित्र काढा

ज्या मुलांना प्राथमिक आकार काढता येतात अशा मुलांकडून हा उपक्रम करून घेता येईल.

त्यांना एखाद्या वस्तूचे निरीक्षण करून तिचे चित्र काढायला सांगावे. तुम्ही पुढील प्रकारच्या वस्तू निवडू शकता :

- बादली, मग, साबण ठेवण्याची पेटी

- चमचा, ताटली, कप, बशी
- स्क्रू ड्रायव्हर, हातोडा, कात्र्या
- बल्ब, ट्यूबलाईट, पंखा

***